# डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
## कृषिनगर, अकोला - ४४४ १०४

एस.टी.राठोड
कुलसचिव

दूरध्वनी : ०७२४-२२५८३७२(कार्यालय)
फॅक्स : ०७२४- २२५८३४८
Email: registrar@pdkv.mah.nic.in

जा. क्र. परीक्षा/वि.जि.रो.पा./२०२२-२३/ /२३/२६११
दिनांकः०५/१०/२०२३

प्रति,

-------------------------------------------
-------------------------------------------
-------------------------------------------

विषय :-योगतज्ञ श्री विठ्ठलराव जिभकाटे, उत्कृष्ट कर्मचारी रोख पारितोषिक सन २०२२-२३ करीता.

संदर्भ :- १) कार्यकारी परिषद विनियम क्र.काप/४९

कृपया कार्यकारी परिषद विनिमय क्र.काप-/४९ परिच्छेद क्रमांक ८ चे अवलोकन करावे, या तरतुदीनुसार आपल्या अधिनिस्त काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी वर्षे २०२२-२०२३ करीता ठेवलेल्या नोंदवहीनुसार कर्मचाऱ्यांचा प्रशासकीय कामाचा कार्यानुभव लक्षात घेवून त्यापैकी दोन उत्कृष्ट कर्मचाऱ्यांची शिफारस वरील पारितोषिकाकरीता आपल्या नियंत्रण अधिकाऱ्यास (Controlling officer) सादर करावी जेणे करून नियंत्रण अधिकारी अशा प्राप्त झालेल्या प्रस्तावामधून शाखा सहाय्यक ते सहाय्यक शाखाधिकारी व समकक्ष वर्गातुन एक व शाखाधिकारी ते सहाय्यक कुलसचिव व समकक्ष कर्मचाऱ्यातून एक, अशा दोन वर्गातुन कर्मचाऱ्यांची माहिती वरील कार्यकारी परिषद विनियमाचे **परिशिष्ट-१** मध्ये भरून या कार्यालयास शिफारसीसह सादर करतील. **विभाग प्रमुखा शिवाय परस्पर येणाऱ्या शिफारशी विचारात घेतल्या जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.**

तरी आपणास विनंती करण्यात येते की, वरील तरतुदीनुसार आवश्यक असलेली माहिती वर्ष २०२२-२०२३ करीता ज्या कर्मचाऱ्यांचा विद्यापीठ सेवेमधील एकूण कालावधी ५ वर्षाचा झालेला असेल अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांची माहिती ठराविक प्रपत्रात भरून कृपया **दिनांक ३१.१०.२०२३ पर्यंत उपकुलसचिव (विवि)** डॉ. पं.दे.कृ.वि.अकोला यांचे नावाने पुढील कार्यवाहीस गोपनीय लिफाफ्यामध्ये पाठवावी. **जर सदर वर्षाकरीता वरील पारितोषिकासाठी शिफारस करण्यायोग्य कर्मचारी उपलब्ध नसल्यास ही माहिती ' निरंक ' म्हणून अवश्य कळवावी.**

०४/१०
कुलसचिव
डॉ. पं.दे.कृ.वि.,अकोला

**गोपनीय**

परिशिष्ट-१

(योगतज्ञ श्री विठ्ठलराव जिभकाटे रोख पारितोषिक आणि प्रमाणपत्र मिळण्याविषयी विभाग प्रमुखांनी उत्कृष्ट कर्मचाऱ्यांची शिफारस करून भरावयाचा तपशिल.)

| | | |
|---|---|---|
| १. | रोख पारितोषिकाकरीता शिफारस करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांचे नाव व पदनांम | |
| २. | ज्या विभागात काम करीत आहे, त्या विभागाचे नांव | |
| ३. | जन्म तारीख | |
| ४. | नोकरीचा ३१ मार्च, पर्यंत एकूण कालावधी | |
| ५. | सध्या ज्या पदावर आहे त्या पदावर घालविलेला कालावधी | |
| ६. | ज्या वर्षाकरिता शिफारस करण्यात आली आहे ते वर्ष | |

**पारितोषिक निवडीकरीता लागणारी इतर माहिती.**

| विवरण | | एकूण गुण | शिफारस केलेले गुण |
|---|---|---|---|
| १. | पदास आवश्यक असणाऱ्या यामुळ अर्हता व्यतिरिक्त ज्यास्तीच्या पदव्या किंवा उच्च पदाच्या किंवा पदविका प्राप्त केल्या असतील तर (धारण करीत असलेल्या पदात स्नातक पदवी किंवा स्नातकोत्तर पदवी आवश्यक असेल तर तसा कर्मचारी त्यापेक्षा जास्तीच्या पदव्यामुळे जास्त गुणास प्राप्त ठरेल. तसेच ज्या पदाकरीता एस.एस.सी. आवश्यक आहे आणि अशा जास्तीच्या पदव्या धारण केल्यास तो जास्तीच्या गुणास प्राप्त ठरू शकेल.) | | |
| अ) | स्नातक पदवी | १ | |
| ब) | स्नातकोत्तर पदवी | १ | |
| क) | पदविका प्रमाणपत्र परिक्षा (टंकलेखन/लघुलेखन) | १ | |
| ड) | जास्तीच्या प्राप्त केलेल्या पदव्या | १ | |
| इ) | शिक्षणात विशेष पदक प्राप्त केले असल्यास | १ | |
| २. | ज्या पदावर काम करीता आहे त्या पदाच्या कामाकरीता लागणाऱ्या अधिनियम, विनिमय व इतर शासकीय विद्यापीठ आदेश परिपत्रकांच्या ज्ञानाविषयी अद्यावत माहिती. | १० | |
| ३. | विषय मांडण्याची पात्रता | १० | |
| ४. | स्वतः पुढाकार घेवून योग्य रितीने कामाचा निपटारा करण्याची पात्रता. | १० | |
| ५. | वरीष्ठ अधिकाऱ्यांशी आज्ञाधारक, प्रामाणिक नम्रतेची वागणूक | ५ | |
| ६ | सहकारी वर्ग, सेवक वर्ग, विद्यार्थी आणि सामान्य जनतेशी सहकाराची भावना. | ५ | |

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | आपल्या सहकाऱ्यामध्ये व इतरांशी कामानुरूप समन्वय साधन्याची क्षमता. | ५ | |
| ८. | कार्यालयीन कामात व उपस्थितीत वक्तशिरपणा | ५ | |
| ९. | खेळ,कला,संगीत,नाटक आणि विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी सतत संघटीत केलेला प्रयत्न (यासंबंधी कुलसचिवांचा दाखला प्रमाण मानला जाईल.) | ३ | |
| १०. | विद्यापीठीय/सार्वजनिक क्षेत्रात विशिष्ट विधायक कामाविषयी मागील तीन वर्षात पुरस्कार प्राप्त केला व त्याबाबत पुरावा सादर केला असल्यास (अशा कार्याची सविस्तर टिपणी द्यावी.) | २ | |
| | | एकुण गुण : ६० | प्राप्त गुण : |

विभाग प्रमुखाची स्वाक्षरी व पदनाम

| | | | |
|---|---|---|---|
| ११. | नियंत्रण अधिकाऱ्यांनी कार्यालय प्रमुखाचे शिफारशी वरून कर्मचाऱ्यांचे पुनर्विलोकन करून द्यावयाचे गुण : | १० | |
| | | एकुण गुण : ७० | प्राप्त गुण : |

नियंत्रक अधिकाऱ्याची स्वाक्षरी व पदनाम

**<u>निवड समितीच्या कक्षेतील भाग</u>**

१२. मागील तीन वर्षातील गोपनिय अभिलेखातील काम विचारात घेवून निवड समितीनी द्यावयाचे गुण : ३०

(परिशिष्ट-१ चे जोडपत्र)

**उत्कृष्ट सेवकांची निवड करतांना परिशिष्ट – १ मधील प्रपत्र भरतांना पुढील बाबी विचारात घ्याव्या.**

१) कार्यालयीन कामात उत्तम, कामाची माहिती व कामाविषयी आस्था असावी.

२) कर्मचारी प्रामाणिक व वक्तशीर असावा.

३) अधिनस्त असलेल्या सेवक वर्गाशी, बरोबरीच्या सहकारी कर्मचाऱ्याशी वरिष्ठ अधिकारी वर्गाशी आदरयुक्त भाव ठेऊन कार्यालयीन शिस्तीने वागणारा असावा.

४) कोणत्याही कार्यात सक्रीय व सहकार्याने भाग घेणारा असावा.

५) विशिष्ट मुदतीच्या आंत काम करणारा असावा. कार्यालयीन कामाव्यतीरीक्त जास्त वेळ काम करणारा असावा.

६) विद्यापीठाला नांव लौकीक मिळवून देण्यासाठी कामावर निष्ठा असणारा असावा.

७) विद्यापीठातील कर्मचारी व अधिकारी यांचे व्यतिरिक्त इतर समाजातील लोक विद्यापीठात कामाकरीता आल्यास त्याच्यांशी अदयीने व सहकार्याने त्यांचे काम त्वरीत पुर्ण करणारा असावा.